आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३ सप्टेंबर २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जगातल्या सुमारे ७५ ते ८० टक्के देशांशी भारताचे मुक्त व्यापार करार लवकरच पूर्ण होतील असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्र्यांचं प्रतिपादन

- फ्लायदुबई विमानातली झटापट दहशतवादी हल्ल्याचा प्रयत्न असल्याचा युएईच्या तपासपथकाचा निष्कर्ष

- अंमली पदार्थांचा कुख्यात तस्कर नवप्रीत सिंहचं तुर्किएतून भारतात प्रत्यार्पण

आणि

- आशियाई क्रीडास्पर्धांमधे भारताला आज आणखी तीन सुवर्णपदकांची प्राप्ती

**<><><><><>**

जगातल्या अर्थव्यवस्थांमधल्या सुमारे ७५ ते ८० टक्के देशांशी भारताचे मुक्त व्यापार करार लवकरच पूर्ण होतील असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. अमेरिकेत शिकागो इथे भारतीय समुदायाने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. भारतानं २०१४ पूर्वी १० ट्रीलियन डॉलर्स मूल्याचं स्थूल राष्ट्रीय उत्पादन असलेल्या अर्थव्यवस्थांशी करार केले होते, त्यात वाढ होऊन आता भारताने ३१ विकसित आणि विकसनशील देशांशी मुक्त व्यापार करार केले असून त्यांचं एकत्रित स्थूल राष्ट्रीय उत्पादन मूल्य ६० ट्रिलियन डॉलर्स आहे. तसेच त्यात लवकरच आणखी १५ ट्रीलियन डॉलर्स मूल्याच्या अर्थव्यवस्थांची भर पडेल असं त्यांनी सांगितलं. यामुळे भारतीय निर्यातदारांना अधिक मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यामध्ये अमेरिकेतल्या भारतीय समुदायानंही सहभागी होण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

वेगानं बदलणाऱ्या जगात आर्थिक सक्षमता ही सामाजिक सक्षमतेपासून वेगळी करता येणार नसून सर्वसामावेशकता हाच सक्षमतेचा पाया आहे, असं मत उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी व्यक्त केलं. ते आज नवी दिल्लीत आयोजित ५व्या कौटिल्य आर्थिक परिषदेच्या उदघाटन सोहळ्यात बोलत होते. ‘बदलत्या काळातली सक्षमता’ ही या परिषदेची

संकल्पना आहे. सहमती, समावेशकता आणि नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन धोरणनिर्मिती केली तर लोकशाही आणि विकास एकत्र पुढे जाऊ शकतात, असं ते म्हणाले. एकही नागरीक, उद्योग किंवा प्रदेश विकासात मागे राहणार नाही याची खात्री म्हणजेच सक्षमता, हे त्यांनी स्पष्ट केलं.

या कार्यक्रमाला भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा हे देखील उपस्थित होते. स्थिर आणि सक्षम वित्तीय व्यवस्थेशिवाय आर्थिक विकासाच्या पूर्ण क्षमतेचा उपयोग करून घेता येणार नाही, यावर मल्होत्रा यांनी भर दिला. भक्कम ताळेबंद आणि बिगर बँकिंग वित्त संस्था यांच्या पाठबळामुळे भारतीय वित्तीय व्यवस्था सक्षम झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकिर्दीला २५ वर्षं पूर्ण होत आहेत. ‘जनसेवेतून देशसेवा आणि सतत समर्पणभाव’ असा हा प्रवास आहे. सेवा आणि सुशासन या सूत्रांचा अवलंब करत २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साकार करण्यासाठी सरकार सातत्यानं काम करत आहे. सर्वसमावेशक विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत आहेत. या विशेष मालिकेत आज आपण ऐकणार आहोत, **ड्रोन दीदी योजने** विषयी…

**- - - होल्ड… कॅप्सूल- - -**

*(ग्रामीण भागात महिला सक्षमीकरणासाठीचं महत्त्वाचं पाऊल केंद्र सरकारने ड्रोन दिदी योजनेच्या स्वरुपात उचललं. शेती करणाऱ्या महिलांना ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करण्याचं प्रशिक्षण देऊन त्यांना सक्षम करण्याच्या हेतूनं ही योजना आखण्यात आली.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मन की बात मधून या योजनेबद्दलची माहिती दिली.*

***- - - होल्ड- बाईट- प्रधानमंत्री - - -***

*नोव्हेंबर २०२३ मधे केंद्रीय मंत्रिमंडळाने ड्रोन दिदी योजनेला मंजुरी दिली. ३ वर्षांच्या कालावधीसाठी योजनेअंतर्गत एक हजार २६१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. त्यानुसार देशभरातल्या निवडक महिला शेतकऱ्यांना १५ हजार कृषी ड्रोनचं वाटप करण्यात येणार आहे. स्वतःच्या शेताचं ड्रोनद्वारे निरीक्षण किंवा फवारणी करण्याबरोबरच या महिलांना ड्रोन सेवा इतरांना उपलब्ध करुन देता येते. कोणत्याही शेतावर पाहणी किंवा फवारणीसाठी या ड्रोन दिदी सेवा भाड्याने देऊ शकतात. या उपकरण आणि सेवेसाठी केंद्रसरकारकडून*

*ड्रोन दिदींना ८० टक्के पर्यंत किंवा जास्तीत जास्त ८ लाख रुपयेपर्यंत अर्थसहाय्य मिळतं. त्यापुढच्या खर्चासाठी कर्ज उपलब्ध करुन दिलं जातं. ड्रोन चालवण्याचं प्रशिक्षणही दिलं जातं. ग्रामीण भागात महिलांच्या उपजीविकेसाठी आणि उत्पन्नासाठी या योजनेमुळे नवीन संधी निर्माण झाल्या असून त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचं स्थान अधिक मजबूत होत आहे.)*

**<><><><><>**

भारत हा आता केवळ जहाजांच्या खरेदीत समाधान मानत नाही तर देशांतर्गत जहाजबांधणी हे आपलं ध्येय आहे, असं केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्गमंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी म्हटलं आहे. शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या स्थापनेला ६५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते. देशाला जहाजबांधणी क्षेत्रात आत्मनिर्भर, जागतिक स्तरावर स्पर्धात्मक आणि जलवाहतूकीसाठी सक्षम बनवण्यात कंपनीनं पुढाकार घ्यावा, असं आवाहन त्यांनी केलं. सागरी अमृत काळ व्हिजन २०४७ अंतर्गत देश आघाडीचे जहाजबांधणी राष्ट्र बनण्याच्या दिशेनं वाटचाल करत असताना, ही कंपनी केंद्रस्थानी असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

अंमली पदार्थांचा कुख्यात तस्कर नवप्रीत सिंहचं तुर्किएतून भारतात प्रत्यार्पण करून भारतानं ऐतिहासिक कामगिरी केली आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. नवाब विर्क या नावाखाली तुर्किएचं बनावट नागरिकत्व मिळवून नवप्रीत सिंह हेरॉइन आणि मेथंफेटामाइन या अंमली पदार्थांची भारतातून अफगाणिस्तानात तस्करी करत होता, अशी माहितीही त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे दिली. भारताच्या यंत्रणांनी त्याला शोधून त्याची खरी ओळख समोर आणून त्याचं प्रत्यार्पण करण्यात यश मिळवल्याबद्दल त्यांनी अभिनंदन केलं.

**<><><><><>**

फ्लायदुबई विमानाच्या सहवैमानिकानं दहशतवादी हल्ला करायचाच प्रयत्न केला, असं संयुक्त अरब अमिरातीच्या तपासात समोर आलं आहे. प्रवासादरम्यान वैमानिकावर कुऱ्हाडीनं हल्ला करून विमानाचा ताबा घ्यायचा प्रयत्न केल्याची माहिती यूएईचे महाधिवक्ता

काउन्सिलर डॉक्टर हमाद सैफ अल शम्सी यांनी दिली. या प्रकरणाचा पुढचा तपास सुरू आहे.

<><><><><>

होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये एका क्षेपणास्त्राचा मारा झालेल्या कुवेती टँकरवरच्या ५ भारतीय खलाशांची यशस्वीरीत्या  सुटका करण्यात आली आहे. ओमान मधल्या भारतीय दूतावासानं ही माहिती दिली असून ओमान च्या अधिकाऱ्यांनी या बचाव कार्यात केलेल्या मदतीबद्दल त्यांचे आभार मानले आहेत. पश्चिम आशियात सुरु असलेल्या संघर्षादरम्यान आतापर्यंत अनेक भारतीय खलाशांना हल्ल्यांना तोंड द्यावं लागलं आहे.

<><><><><>

जपानमध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडू पदकांची संख्या वाढवण्यात आजही यशस्वी ठरले.

गोल्फमध्ये प्रणवी उर्स हिने अंतिम फेरीत केवळ एका स्ट्रोकची आघाडी कायम राखत सुवर्णपदकाला गवसणी घातली. आशियायी क्रीडा स्पर्धेत गॉल्फमध्ये वैयक्तिक सुवर्णपदक मिळवणारी ती पहिली भारतीय महिला गोल्फपटू बनली आहे.

भारतीय तिरंदाज कुमकुम मोहोड हिने महिलांच्या वैयक्तिक रिकर्व्ह प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. या पदकासह ती आशियायी क्रीडा स्पर्धेत महिलांच्या वैयक्तिक रिकर्व्ह प्रकारात सुवर्णपदक पटकावणारी पहिली महिला तिरंदाज ठरली आहे.

आत्ताच हाती आलेल्या वृत्तानुसार पुरुष क्रिकेटमध्येही भारतानं पाकिस्तानला धूळ चारून सुवर्णपदकावर नाव कोरलं. भारतानं पाकिस्तानसमोर २१२ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. त्यापूर्वी भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेत २० षटकात ६ बाद २११ धावा केल्या. सलामीवीर अभिषेक शर्मा याने २८ चेंडूत ६१ धावा केल्या. तर तिलक वर्मा २२ चेंडूत ५१ धावा काढून नाबाद राहिला. शिवम दुबे याने १४ चेंडूत २७ धावा काढत भारताची धावसंख्या दोनशेच्या पार नेली. प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानचा संघ निर्धारित २० षटकांत ६ खेळाडूंच्या मोबदल्यात १९२ धावाच करू शकला. अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी २ खेळाडूंना तंबूत धाडलं.

भारतीय तिरंदाज नीरज चौहान याने पुरुषांच्या रिकर्व्ह प्रकारात आपला सहकारी धीरज बोम्मदेवराला पराभूत करून कांस्यपदक जिंकलं.

भारतीय कुस्तीगीर अमन सेहरावत याने पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत तर अंतिम पंघाल हिने महिलांच्या ५३ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. दीपक पुनिया याने पुरुषांच्या ९७ किलो वजनी गटाच्या तर सागर जगलान याने ७४ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला असून आता हे दोघेही कांस्य पदकासाठी लढणार आहेत. महिलांच्या ६५ किलो वजनी गटात मात्र महिला कुस्तीगीर मनीषा भानवालचं आव्हान संपुष्टात आलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यशस्वी खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे.

आशियायी क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणाऱ्या महिला हॉकी संघाच्या सदस्यांना प्रत्येकी ११ लाख रुपयांचं बक्षीस दिलं जाणार असल्याची घोषणा ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण मांझी यांनी केली आहे.

भारत पदकतालिकेत सध्या ५व्या स्थानावर आहे. भारताची एकूण पदकसंख्या ८१ झाली असून यात १९ सुवर्ण, २६ रौप्य आणि ३६ कांस्य पदकांचा समावेश आहे.

//<><><><><>//